मग्रारोहयो अंतर्गत गांव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणीसाठा योजनेतील गाळ काढणे,विशेष दुरुस्ती व नूतनीकरण करणे.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मग्रारोहयो-२००८/प्र.३५/रोहयो-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २००८

दाचा :-१. शासन निर्णय क्रमांक:रोहयो-२००१/प्र.३२(अ)/रोहयो-६, दिनांक १५.३.२००१
२. शासन निर्णय क्रमांक:रोहयो-२००२/प्र.६/रोहयो-६, दिनांक १४.१.२००२
३. शासन निर्णय क्रमांक:रोहयो-२००१/प्र.१२५/रोहयो-६, दिनांक १३.५.२००२
४. शासन परिपत्रक क्रमांक:रोहयो-२००३/प्र.२९/रोहयो-६, दिनांक ९.४.२००३ व दिनांक १७.९.२००३
५. शासन निर्णय क्रमांक:रोहयो-२००३/प्र.९५/रोहयो-६, दिनांक ७.८.२००३
६. शासन परिपत्रक क्रमांक:रोहयो-२००३/प्र.११७/रोहयो-६, दिनांक ४.९.२००३
७. शासन परिपत्रक क्रमांक:रोहयो-१००४/प्र.३९/रोहयो-६, दिनांक २१.२.२००४ व दिनांक ५ मार्च, २००४
८. शासन परिपत्रक क्रमांक:रोहयो-१००४/प्र.१५/रोहयो-६, दिनांक २९.७.२००४
९. शासन निर्णय क्रमांक:रोहयो-१००३/प्र.१९०/रोहयो-६, दिनांक १०.१.२००५

प्रस्तावना :-

महाराष्ट्रात १९७२ सालापासून दुष्काळ निवारण्याची विविध कामे हाती घेण्यात आली होती. १९७७ सालापासून राज्यात रोजगार हमी कायदा १९७७ अंमलात येऊन विविध कामे हाती घेण्यात आली. यामध्ये पाझर तलाव, गांव तलाव मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले. कालांतराने या तलावामध्ये गाळ साठल्यामुळे ही कामे निरुपयोगी होऊ लागली. रोजगार हमी योजनेंतर्गत वेळोवेळी या तलावातील गाळ काढण्यासंबंधी आदेश निर्गमित केले होते.

२. दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून महाराष्ट्रात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ महाराष्ट्रात रोजगार हमी अधिनियम १९७७ सुधारुन महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम २००६ कार्यान्वित करण्यात आला. १ एप्रिल, २००८ पासून संपूर्ण राज्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:-

३. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम २००६ अन्वये घ्यावयाच्या कामांची प्राधान्यक्रमाने यादी अंतर्भूत केलेली आहे. यामधील परिच्छेद ७ (२) (ए) मध्ये E क्रमांकावर पारंपारिक पाणी साठयाचे नुतनीकरण व तलावातील गाळ काढण्याचे काम अंतर्भूत आहे. ही कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय असल्यामुळे ही कामे घेण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ मधील परिच्छेद (५) (१) अ.क्र.५ मध्ये व महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम २००६ मध्ये परिच्छेद ७ (२) (ए) अंतर्भूत असलेले पारंपारिक पाणीसाठयाचे नुतनीकरण व तलावातील गाळ काढण्याचे काम अंतर्भूत असल्यामुळे महाराष्ट्रातील पाझर तलाव, गांव तलाव व पारंपारिक पाणीसाठयातील गाळ काढणे व नुतनीकरणाचे कामास मग्रारोहयो मध्ये घेण्यास मान्यता आहे.

२) ही कामे सर्वसाधारण परिस्थितीत घेण्याची परवानगी आहे. (टंचाईसदृश्य परिस्थिती नसतानासुध्दा)

३) पारंपारिक पाणीसाठा, पाझर तलाव व गांव तलावामधील गाळ रोजगार हमी योजने अंतर्गत काढण्याबाबत या अगोदर निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहेत.

वरील कामे करण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

तांत्रिक बाबी :

१. गाळ काढण्याचे काम तांत्रिक कौशल्याचे असल्यामुळे ही कामे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), जिल्हा परिषद किंवा जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंत्यातर्फे हाती घेण्यात यावीत.

२. ही कामे हाती घेण्यासंबंधी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रक्रिया अवलंविण्यात यावी.

३. १५ वर्षापेक्षा जुन्या तलावातील गाळ काढण्यासच परवानगी राहील. तसेच ज्या तलावातील गाळ मागील ५ वर्षात काढलेला नाही अशा तलावाचा गाळ काढण्यास परवानगी राहील.

४. जे शेतकरी हा गाळ आपल्या शेतात टाकू देतील त्यांच्या शेतात हा गाळ शासकीय खर्चाने टाकावा. अन्यथा ज्या सरकारी जागा उपलब्ध असतील तेथे गाळ टाकावा.

५. एकाच हंगामामध्ये पावसाळा सुरु होण्यापूर्वी हा गाळ काढण्यात यावा व ते काम पूर्ण समजण्यात यावे.

६. मूळ पाणीसाठयामध्ये वाढ न करता कोणत्याही परिस्थितीत वाढीव भूसंपादन करण्यात येवू नये.

७. गाळ काढण्यासोबतच इतर बाबींची दुरुस्ती करण्याची गरज असेल तेथे त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

८. तलावाचा कंटूर सर्वे करुन सध्याची पाणी साठवण क्षमता व तलावाची प्रकल्पीत पाणी साठवण क्षमता याची तुलना करुन कार्यकारी अभियंता यांनी पाणी साठा किती कमी झाला याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे.

९. ज्या तलावाची साठवण क्षमता २५% पेक्षा जास्तने कमी झाली असेल त्याच तलावातील गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात यावीत. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी दयावे.

१०. अंदाजपत्रके तयार करतांना खोदाईचे परिमाणात ओल्या मातीतील आर्द्रता जास्तीत जास्त २० टक्के मर्यादित ठेवण्यात यावी.

११. तलावातील गाळ काढल्यानंतर तो तलावात पुन्हा येवू नये यासाठी तो धरणाच्या खालच्या भागात टाकावा. हे अंतर जास्तीत जास्त १ कि.मी. पर्यन्त राहील.

१२. ही कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत येत असल्यामुळे शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.डीपीडब्ल्यू-११८९/(५७)/लेखा परिक्षा, दिनांक १८ नोव्हेंबर, १९९६ अन्वये

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली -३ परिशिष्ट ४२ मधील अनु.क्र.१३ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३५ (एक) (३) (अ) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन कार्यकारी अभियंता यांना रु.५.०० लक्ष पर्यन्त तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार राहतील. त्यापेक्षा जास्त रकमेच्या किंमतीच्या कामास अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ हे तांत्रिक मान्यता देतील.

१३. एका तलावाच्या दुरुस्तीच्या कामाचा कमाल खर्च रु.१०.०० लक्ष राहील.

प्रशासकनिक बाबी :-

या कामास प्रशासकीय मान्यता जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी देतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट क्रमांक www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक 200L0L2198048U007 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अशोक जाधव)
विशेष कार्य अधिकारी (मग्रारोहयो)

क्रमांक : रोहयो/का-१/टे-५ वारो-802 /२००८
विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोंकण भवन, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक: १५/ ९ /२००८

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री खाजगी सचिव.
सर्व मा.राज्यमंत्री खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल),
सर्व तहसिलदार (मुंबई शहर व उपनगर वगळून),
सर्व गट विकास अधिकारी (मंबई शहर व उपनगर वगळून).
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी रोहयो प्रभाग,नियोजन विभाग,मंत्रालय,
उपसचिव, विधानमंडळ रोहयो समिती, विधानभवन, मुंबई,
कक्ष अधिकारी, रोहयो-१ (सारसंपादनासाठी)

प्रति,
जिल्हाधिकारी
ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

11 SEP 2008

वरील शासन निर्णयाचे अवलोकन करावे. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

विभागीय आयुक्त कोंकण विभाग करिता